# दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५८/२०१७ मधील नि. ५४ खालील आदेश

कृष्णा भिडे व.२ अर्जदार

*विरुद्ध*

राधाकृष्ण मंदीर वैश्यसंस्था रत्नागिरी व.१२ सामनेवाला

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांचे मुखत्यार आनंद कृष्णा भिडे यांनी अर्जदार नं. १ यांचे वारसांना त्यांना अर्जाचे कामी अर्जदार नं. १ चे वारस म्हणून सामील करुन घ्यावे व तशी दुरुस्ती करण्याची परवानगी मिळावी यासाठी केलेला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्जदार नं.१ हे दिनांक १६/०५/२०२० रोजी मयत झाले. अर्जदार नं. १ यांस अर्जात नमूद कायदेशीर वारस असून, त्यांना अर्जाचे कामी सामील करण्याची व तशी दुरुस्ती करण्याची परवानगी मिळावी.

२. अर्जदाराने अर्जासोबत मयत कृष्णा पर्शुराम भिडे यांचा मृत्यु दाखला हजर केलेला आहे. या अर्जाकामी सामनेवाला यांनी म्हणणे सादर केलेले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज म्हणण्याविना चाललेला आहे.

३. अर्जाचे अवलोकन केले. अर्जदारतर्फे वकीलांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाकामी अर्जदार नं. १ चे वारस अभिलेखावर आणण्यास झालेल्या विलंबाबाबत दाखल विलंब माफिचा अर्ज मंजूर करण्यात आलेला आहे. त्यामुळे अर्जात नमूद वारसांना अर्जाचे कामी सामील करणेस व तशी अर्जात दुरुस्ती करणेस परवानगी देणे न्यायोचित आहे. सबब, खालील आदेश करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२.  अर्जदारतर्फे, अर्जदार यांचे अर्जात नमूद कायदेशीर वारस, अर्जाचे कामी विहित मुदतीत समाविष्ट करावेत व तशी दुरुस्ती करावी.

सही/-

दिनांकः- ०८/११/२०२१

(एम्.क्यु.एस्.एम्.शेख)

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी.